SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR – 416 004, MAHARASHTRA
PHONE : EPABX – 2609000, www.unishivaji.ac.in.
email- stores@unishivaji.ac.in
Estd. 1962
"A++" Accredited by NAAC(2021) With CGPA 3.52
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४,महाराष्ट्र
दूरध्वनी - ईपीएबीएक्स - २६०९०००, भांडार विभाग ०२३१-२६०९०८५/८६

शिवाजी वि/भांडार/SIK/ 10 दिनांक 10/01/2024

## कोटेशन नोटीस

प्रति,
संबंधित पुरवठाधारक

महोदय,

विद्यापीठामार्फत आयोजित करण्यात येणा-या विविध सेमिनार, परिषदा, युवा महोत्सव तसेच परदेशी पाहूणे यांच्यासाठी तसेच विद्यापीठातून सेवानिवृत्त होणा-या सेवकांना देण्यात येणा-या छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारुढ पुतळयाच्या प्रतिकृतीच्या स्मृतिचिन्हे वार्षिक दर करारांतर्गत तयार करुन घ्यावयाची आहेत. तरी संबंधित पुरवठाधारकांनी खालीप्रमाणे दरपत्रक बंद लिफाफयातून नोंदणीकृत (GST प्रमाणपत्र असलेल्या) पुरवठाधारकानी विद्यापीठा कार्यालयात मा.वित्त् व लेखाधिकारी, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचे नांवे दि.20/1/2024 रोजीपर्यत कार्यालयात पोहातील अशा रितीने समक्ष अथवा पोष्टाने पाठवावतीत. मुदतीनंतर आलेल्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही. विद्यापीठास आवश्यक स्मृतिचिन्हे खालील तांत्रिक वर्णन,व नग संख्या

**अटी व शर्ती**

| तपशील | नगसंख्या |
|---|---|
| कार्यालयाकडील उपलब्ध नमुन्यानुसार छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारुढ पुतळयाच्या फायबरमधील प्रतिकृती साईज 13"x20"x6.6" Fiber | अंदाजे ५० नग |

१. वस्तूचा पुरवठा कार्यालयीन नमुन्याप्रमाणे व त्यावरील रंगसंगती प्रमाणे करावयाचा आहे.
२.नमुन्याप्रमाणे नसलेले नग पुन्हा वेळेत तयार करुन द्यावे लागतील व त्यासाठी वेगळा आकार दिला जाणार नाही.
३.ऑर्डर पोटी अॅडव्हान्स रक्कम दिली जाणार नाही.
४.ज्या पुरवठादाराचे दर मान्य केले आहेत त्यांना एकूण खरेदी रकमेच्या ५ टक्के रक्कम सुरक्षा ठेव म्हणून कार्यालयात रोखीने भरावी लागेल.
५.बिल दोन प्रतीत मा. वित्त व लेखा अधिकारी, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचे नावे अॅडव्हान्स स्टॅम्प रिसीटसह द्यावे लागेल.
६. दरपत्रके स्वीकृत झाली आहेत असे पुरवठाधारकास कळविल्यानंतर दरपत्रकामंधील अटी व शर्तीचा अंतर्भाव असलेल्या हमीपत्राचा मसुदा विद्यापीठाकडून पाठविला जाईल व ते हमी पत्र आवश्यक त्या मंजूर दिनांक व सही शिक्क्यासह ०५ दिवसांत विद्यापीठाकडे परत करावयाचा आहे. विहीत मुदतीत करारनामा करून न दिल्यास बयाणा रक्कम जप्त करून दुस-या निविदाधारकाकडून पुरवठयाची प्रक्रिया सुरू केली जाईल.
७. देयकाची १०० टक्के रक्कम सर्व पुरवठा झाल्यानंतर वस्तू आवश्यकतेप्रमाणे असलेबाबत खात्री करून आदा केली जाईल.
८ पुरवठाधारकाला आदा केल्या जाणा-या देयकांच्या रकमेमधून प्रचलित दरानुसार (शासनास देय असलेली) कराची रक्कम वजा केली जाईल.
९. पुरवठधारकाकडून हमीपत्रात नमूद केलेल्या वस्तूचा पुरवठा वेळेत न झाल्यास विद्यापीठास करारातील हक्क अबाधीत ठेवून नुकसान भरपाई (दंडाची रक्कम) खालीलप्रमाणे वसुल करता येईल.
१०. उशिरा पुरवठा केलेल्या वस्तूंच्या मालाच्या किंमतीवर ०.५ टक्के प्रति आठवडयाप्रमाणे दंड आकारणी केली जाईल व जास्तीत ५ टक्के दंड आकाराला जाईल.
११ दरपत्रकासोबत १. जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र, २. संस्था नोंदणी प्रमाणपत्र जोडावे ३.पुरवठाधारकांची यादी
१२. वस्तुचा पुरवठा आदेशाच्या दिनांकापासून १५ दिवसांमध्ये करावयाचा आहे.
१३. कमी अगर जास्त दराचे दरपत्रक अथवा सर्वच दरपत्रक नाकारण्याचा अगर स्वीकारण्याचा अधिकार कार्यालयाने राखून ठेवला आहे.
१४. पुरवठाधारकासोबत करारपत्र झाल्यानंतर संबंधित पुरवठाधारकास सदर नमुन्यातील प्रतिकृती इतर कोणत्याही ग्राहकास विकता येणार नाही.

उपकुलसचिव

संदर्भ क्र. दिनांक :–

प्रति,

मा. वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

स्मृतिचिन्हाचे दरपत्रक

| PARTICULARS | दर रूपये सर्व करासह विद्यापीठ पोहोच (प्रती नग) |
|---|---|
| कार्यालयाकडील उपलब्ध नमुन्यानुसार छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारुढ पुतळयाच्या फायबरमधील प्रतिकृती साईज 13"x20"x6.6" Fiber | |

1. विद्यापीठ स्मृतिचिन्ह योग्यरीतीने नसलेले व कार्यालयाने नाकारलेले नग पुन्हा तयार करुन त्याचा पुरवठा स्वखर्चाने तात्काळ करू.
2. स्मृतिचिन्हाचा दर हे सर्व कर व स्थानिक संस्था करासहीत विद्यापीठ कार्यालयात पोहोच आहेत.
3. दर मान्य झालेस एकूण खरेदी रकमेच्या 3 टक्के रक्कम सुरक्षा ठेव म्हणून कार्यालयात रोखीने भरली जाईल.
4. बिल दोन प्रतीत **मा. वित्त व लेखा अधिकारी, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर** यांचे नावे ॲडव्हान्स स्टॅम्प रिसीटसह देण्यात येईल.
5. साहित्यांचा पुरवठा 15 दिवसात केला जाईल.

कोटेशनधारकाची सही, शिक्का
व पूर्ण पत्ता